MHBH040002192026

**फौ.कि.अर्ज क्र.२१/२०२६ मधील निशाणी क्रमांक १ वरील आदेश**

(शंकर वि. महाराष्ट्र सरकार)

(पोलीस स्टेशन, लाखनी, गु.र.क्र.५९/२०२६, भा.न्या.स., २०२३ चे कलम २८१, १२५(a), १२५(b), १८४ प्रमाणे)

१. अर्जदाराचे निशाणी क्र.१ मधील कथन असे की, अर्जदाराच्या मालकी व कब्जातील एक होंडा कंपनीची शाईन एस.पी. १२५ मोटरसायकल क्र.एम.एच.३६/एपी–७३९० असा असून ती लाखनी पोलीस स्टेशन गु.र.नं.५९/२०२६ कामी जप्त केलेली असून ती परत मिळावी म्हणून त्याने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराने त्याच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, सदर मोटरसायकल अप.क्र.५९/२०२६ वर नमुद कलमां कामी जप्त केलेली असून ती परत मिळावी म्हणून त्याने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर मोटरसायकल संबंधी संपूर्ण तपास झाला असून ती त्याच्या ताब्यात न मिळाल्यास ती पोलीस स्टेशन, लाखनी येथे एका जागेत पडून राहिल्यास त्यांच्यात बिघाड होऊन अर्जदाराचे नुकसान होईल. अर्जदार न्यायालयाने दिलेल्या शर्ती व अटींचे पालन करण्यास तयार आहे. शेवटी त्याने सदरचा अर्ज आपल्या मागणीप्रमाणे मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर तपासी अंमलदार व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा खुलासा मागविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी (नि.क्र.५) प्रमाणे तर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.१ च्या मागे आपले म्हणणे सादर केलेले आहे. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या खुलाशात सदरची मोटरसायकल आर.टी.ओ. परिक्षणाकरीता डिटेन करुन ठेवण्यात आली असून सदरचे परिक्षण झाल्यानंतर लगेच मोटरसायकल मालकाच्या सुपूर्दनाम्यावर देण्यात येईल असे नमुद केले आहे. तर सहाय्यक सरकारी अभियोक्ता देखील तपासीक अधिका–यांच्या खुलाश्या प्रमाणे नमुद करुन आर.टी.ओ. कडून तपासणी होणे बाकी असल्याचे नमुद करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

४. आपल्या कथनाच्या समर्थनार्थ अर्जदार यांनी प्रकरणात गु.र.नं.५९/२०२६ मधील प्रथम खबर अहवालची छायांकित प्रत, वाहन नोंदणी प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत, वाहन चालविण्याच्या परवान्याची पडताळणी केलेली प्रत, वाहनाच्या विम्याची ऑनलाईन प्रत व त्याच्या आधारकार्डची पडताळणी केलेली प्रत अशी कागदपत्रे अभिलेखावर सादर केलेली आहेत. अर्जदाराचे विधीज्ञ श्री.आर.जे. पिल्लारे व सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एन.पी.लडकत यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरचे वाहन अर्जदाराच्या नावे असल्याचे दिसून येते. जप्ती पासून सदरचे वाहन पोलीस स्टेशन, लाखनी, तह.लाखनी जि. भंडारा येथे आहे. पोलीसांच्या ताब्यात ठेवणे संयुक्तिक नाही. मा. नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुदंरभाई अंबालाल देसाई आणि सि. एम.मुदालिअर विरुध्द गुजरात सरकार** (ए.आय.आर २००२ सुप्रीम कोर्ट ६३८) या न्यायानिवाड्यामध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार जप्त मुद्देमाल हे पोलीस स्टेशन, लाखनी, तह. लाखनी, जि. भंडारा यांच्या ताब्यात न ठेवता लवकरात लवकर त्याचा ताबा योग्य त्या व्यक्तीस देणे उचित राहील. या गुन्ह्यातील संपरीक्षा होऊन गुणदोषावर त्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे सदरचे वाहन पोलीस स्टेशन, लाखनी यांचे कार्यालयाचे परिसरामध्ये ठेवणे योग्य राहणार नाही.

६. या ठिकाणी भा.ना.सु.स. चे कलम ४९७ चा उहापोह केला असता असे दिसून येते की, न्यायादंडाधिकारी यांच्या समक्ष हजर करण्यात आलेल्या जप्त मुद्देमाल मिळकतीचे कलम ४९७ (२) नुसार सविस्तर वर्णन नमुद करून शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे त्याचे तपशील (statement) तयार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उपकलम (३) नुसार सदर मिळकतीचे छायाचीत्र अथवा आवश्यकता भासल्यास छायाचीत्रण मोबाईल फोन किंवा इतर साहित्याच्या माध्यमातून करून घेण्याबाबत न्यायदंडाधिका–यांनी आदेशीत करावे. सदरचा मुद्देमाल या न्यायालया समक्ष हजर करण्यात आला नाही. त्यामुळे या टप्प्यावर जप्त मुद्देमाल बाबत सदरचा तपशील (statement) तयार करण्यात आले नाही. असे जरी असले तरी सदर जप्त मुद्देमाल मोटरसायकलचे छायाचीत्र काढण्याबाबत निर्देश देणे योग्य राहिल.

७. सबब, वरील विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रती येऊन पोहोचलो की, सदरच्या वाहनांचा अंतरिम ताबा कलम ५०३ (१) भा.ना.सु.स., २०२३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार योग्य त्या अटी व शर्ती लादून अर्जदाराच्या ताब्यात देणे योग्य असल्याचे या क्षणी दिसून येते. सदरच्या मोटरसायकलचा ताबा अर्जदारास देतांना त्याच्याकडून मोटरसायकलचे रितसर कागदपत्र तपासिक अंमलदार यांच्या कडे सादर करणे बाबत आदेश करणे योग्य राहील. सबब, उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरुन सदरचे मोटरसायकल अर्जदाराच्या ताब्यात देणे न्यायोचित असल्याचे हया टप्प्यावर प्रथमदर्शनी दिसून येते. सदर मुद्देमाल अर्जदारास परत करतेवेळी हमी घेणे अनिवार्य आहे. सबब प्रस्तुत खटल्यातील नमूद मुद्देमाल हमी घेवून अर्जदारास तात्पुरते परत करणे न्यायोचित आहे. परिणामी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गु.र.क्र. ५९/२०२६, भा.न्या.स., २०२३ चे कलम भा.न्या.स., २०२३ चे कलम २८१, १२५(a), १२५(b), १८४ प्रमाणे मध्ये जप्त केलेला मुद्देमाल एक होंडा कंपनीची शाईन एस.पी. १२५ मोटरसायकल क्र.एम.एच.३६/एपी–७३९० ही अर्जदार शंकर विठोबा कठाने, राहणार जैतपूर पो.बारव्हा, तह.लाखांदूर, जि.भंडारा यांचेकडे खालील अटी व शर्तीवर सुपुर्द करण्यात येते.

३. तपासीक अंमलदार/ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे लाखनी, यांना असे निर्देशित करण्यात येते की, कागदपत्रांची पडताळणी करुन वर उल्लेखित मुद्देमाल मोटरसायकल अर्जदारास सुपूर्द करण्यात यावी. तसेच त्यांनी मुद्देमाल सुपूर्द करण्यापुर्वी त्यांचे छायाचित्र काढावे, सदर छायाचित्र व पंचनाम्याची प्रत प्रस्तुत खटल्यासोबत दाखल करावी. मुद्देमालाच्या छायाचित्रावर अर्जदाराने साक्षांकित करुन स्वाक्षरी करावी. सदरचे छायाचित्र काढण्याचा खर्च अर्जदार याने सोसावा.

४. अर्जदाराने वर नमूद मुद्देमाल मोटरसायकलच्या हमी पोटी रुपये १,००,०००/– (एक लाख रुपये) चा सुपूर्दनामा/बंधपत्र देवून हमी दयावी की, ज्यावेळी न्यायालय सदरची

रक्कम भरण्याबाबत/जमा करण्याबाबत आदेशीत करेल त्यावेळी अर्जदार हे सदरची रक्कम न्यायालयात भरणा/जमा करतील.

५. अर्जदाराने मुद्देमालाच्या स्वरुपात बदल करु नये, अभिहस्तांतरण करु नये, खटल्याच्या कामी जेव्हा केव्हा गरज पडेल तेव्हा सदरची मोटरसायकल न्यायालयात हजर ठेवण्याची तजवीज ठेवावी. त्याचप्रमाणे तपासीक अंमलदार यांनी लेखीमध्ये कळविल्यास त्यांच्या समोर सदरची मोटरसायकल हजर करावी.

६. अर्जदाराने वर नमूद मुद्देमाल मोटरसायकल बाबतच्या कागदपत्रांची प्रत तपासीक अधिकारी/ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे, लाखनी यांना उपलब्ध करुन दयावी.

७. अर्जदार अथवा त्याच्या वतीने इतर कोणीही वर नमुद जप्त वाहनाचा उपयोग भविष्यात कोणत्याही गुन्ह्याकामी करू नये.

८. ठाणे अंमलदार/तपासीक अंमलदार, पोलीस ठाणे, लाखनी यांनी सदरचा सुपूर्दनामा/ बंधपत्र या गुन्ह्यातील दोषारोप पत्रासोबत दाखल करावा.

UDAY PRAKASH HINGMIRE
Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.06.08 14:00:18 +0530

(यु.पी.हिंगमिरे)

दिनांकः– ०८/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,

**लाखनी**

**::Certificate::**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.R.Gatey |
| Court Name | : | J.M.F.C. Court, Lakhani |
| Date | : | 08/06/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 08/06/2026 |
| Judgment uploaded on | : | 08/06/2026 |